विधि व न्याय विभागाच्या विधि विधान शाखेमध्ये विधि विधानाच्या कामकाजाबाबत 'विधि विधान इंटर्नशिप उपक्रम' व त्या अंतर्गत विद्यार्थ्यांच्या निवडीचे निकष, अटी व शर्ती आणि उपक्रमाच्या अंमलबजावणी बाबत.

**महाराष्ट्र शासन**
**विधि व न्याय विभाग, विधिविधान शाखा,**
**शासन निर्णय क्रमांक. एलइजी- १०८२/ब,२०२३ ,**
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक २४ नोव्हेंबर, २०२३.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्य हे देशात उत्तम कायदे करणारे एक अग्रेसर राज्य आहे. विधि व न्याय विभागातील विधि विधान शाखा ही महाराष्ट्र राज्याच्या कायद्यांचे मसूदे तयार करण्यासाठी व त्याअनुषंगाने करण्यात येणारी सर्व कामे करण्यासाठी विशेष स्वतंत्र शाखा सन १९७४ साली स्थापन करण्यात आलेली आहे. विधि विधान शाखा ही केंद्र शासनाच्या Legislative Department, Ministry of Law and Justice, New Delhi च्या धर्तीवर स्थापन केलेली आहे.

विधि विधान शाखेमध्ये, सर्व मंत्रालयीन विभागांकडून नवीन कायदे तयार करणे, कायद्यांमध्ये सुधारणा करणे, अध्यादेश प्रख्यापित करणे, अधिनियमांखालील नियम तयार करणे, अधिसूचना काढणे, इत्यादींबाबतच्या प्रस्तावांचे मसुदे तपासण्यासाठी व अंतिम करण्यासाठी येतात. विधेयकांचा मसुदा बनविण्यापासून ते विधेयक विधानमंडळात पारीत झाल्यावर, त्यास मा. राज्यपालांची / मा. राष्ट्रपतींची मान्यता घेऊन शासन राजपत्रात महाराष्ट्राचा अधिनियम म्हणून प्रसिध्द होईपर्यंतचे कामकाज विधि विधान शाखेमध्ये केले जाते.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० याच्या अंमलबजावणीमध्ये शैक्षणिक अभ्यासक्रमामध्ये इंटर्नशिप हा महत्वाचा भाग असून विधि विषयक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना इंटर्नशिप लागू करण्यात आली आहे.

विधि विधान विषयक कार्यपध्दतीची माहिती कोणत्याही विधि महाविद्यालयात अथवा विधि विद्यापीठात शिकवली जात नाही किंवा महाविद्यालयीन पाठ्यक्रमाचा किंवा अभ्यासक्रमाचा ही भाग असत नाही. उपरोक्त कामकाजाची माहिती कायद्याचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना व्हावी व त्याचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा, जेणेकरून त्या अनुभवाचा या विद्यार्थ्यांना त्यांच्या कायदेक्षेत्रातील पुढील करियर करीता व भविष्यातील वाटचालीस उपयोग व्हावा या दृष्टीकोनातून विधि व न्याय विभागाच्या विधि विधान शाखेमध्ये, महाराष्ट्र राज्यात कायद्याचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांकरीता ६ आठवड्यांचा इंटर्नशिप उपक्रम राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

महाराष्ट्र राज्यात कायदेविषयक शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना, विधि व न्याय विभागाच्या विधि विधान शाखेमध्ये कायदे तयार करणे, कायद्यांमध्ये सुधारणा करणे, अध्यादेश प्रख्यापित करणे, विधानमंडळात विधेयके पारित करण्याची कार्यपध्दती अधिनियमांखालील नियम तयार करणे, अधिसूचना काढणे, याची माहिती व्हावी व त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी तसेच त्या अनुभवाचा विद्यार्थ्यांना त्यांच्या कायदेक्षेत्रातील पुढील करियरसाठी व भविष्यातील वाटचालीस उपयोग व्हावा या

दृष्टीकोनातून विधि व न्याय विभागाच्या विधि विधान शाखेमध्ये, १० विद्यार्थ्यांकरीता ६ आठवड्यांचा इंटर्नशिप उपक्रम राबविण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

२. या शासन निर्णयाअन्वये राज्यात कायद्याचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांकरीता, विधि व न्याय विभागातील विधि विधान शाखेत, इंटर्नशिप उपक्रम राबविणे, विद्यार्थ्यांच्या निवडीसंदर्भातील निकष, अटी व शर्ती ठरविणे, उपक्रमाची रुपरेषा व अंमलबजावणी याकरीता मान्यता देण्यात येत आहे.

३. -विधि विधान इंटर्नशिप उपक्रम॰ या करीता विद्यार्थ्यांच्या निवडी संदर्भातील निकष, त्यांच्या निवडी संदर्भातील अटी व शर्ती तसेच या उपक्रमाची रुपरेषा व अंमलबजावणीबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

**विद्यार्थ्यांच्या निवडी संदर्भातील निकषः-**

(१) **शैक्षणिक अर्हता :-** इंटर्नशिप उपक्रम महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही मान्यता प्राप्त विधि महाविद्यालय किंवा विधि विद्यापीठ यांमधून विधि पदवी किंवा पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांकरीता असेल,-

(अ) **पाच वर्षांचा विधि पदवी अभ्यासक्रम** :- चौथ्या किंवा पाचव्या वर्षात शिकत असलेले विद्यार्थी;

(ब) **तीन वर्षांचा विधि पदवी अभ्यासक्रम** :- दुसऱ्या किंवा तिसऱ्या वर्षात शिकत असलेले विद्यार्थी;

(क) **विधि पदव्युत्तर पदवी (LL.M. (Master of Laws)** :- पहिल्या किंवा दुसऱ्या वर्षात शिकत असलेले विद्यार्थी.

(२) **अर्ज करावयाची पध्दत :-** इंटर्नशिपचे अर्ज विद्यार्थ्यांनी संबधित महाविद्यालयाकडे किंवा विद्यापीठाकडे सोबत जोडलेल्या नमुन्यात करावयाचा आहे. महाविद्यालयाने किंवा विद्यापीठाने त्यांना प्राप्त झालेल्या अर्जांपैकी जास्तीत जास्त दोन अर्ज sec.legislation@maharashtra.gov.in या इमेल आयडी वर पाठविणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांची निवड, इंटर्नशिपच्या तारखा व कालावधी, इत्यादी बाबत स्वतंत्र आदेश प्रत्येक वर्षी निर्गमित करण्यात येईल.

(३) **विद्यार्थ्यांची संख्या :-** सदर उपक्रमाअंतर्गत एकूण १० विद्यार्थ्यांची निवड करण्यात येईल त्यापैकी पन्नास टक्के महिला विद्यार्थ्यांची निवड करण्यात येईल. महिला विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास त्याऐवजी पुरुष विद्यार्थ्यांची निवड करण्यात येईल.

(४) **निवडी संदर्भातील कार्यवाही :-** विद्यार्थ्यांच्या निवडीसाठी अर्ज मागविणे, अर्जांची छाननी करणे, विद्यार्थ्यांची निवड करणे, या सर्व बाबी सचिव (विधि विधान) यांच्या मार्गदर्शनाखाली विधि व न्याय विभागाच्या विधि विधान शाखेकडून पार पाडण्यात येतील.

(५) **इंटर्नशिप उपक्रमाची रुपरेषा:-**

(क) शासनाच्या कामकाजाबद्दलची माहिती ,

(ख) विधेयकांचे व अध्यादेशांचे प्रारुप तयार करण्याबाबतची कार्यपध्दती (Drafting of Bills and Ordinances),

(ग) अधिनियमाखाली नियम व अधिसूचना तयार करण्याची / बनविण्याची कार्यपध्दती (Drafting of Rules and Notifications under Act),

(घ) विधान मंडळात विधेयके पारित करण्याबाबतची कार्यपध्दती (Bill passing procedure in State Legislature),

(ङ) विधि विधान शाखेतील अधिकारी, विधि विधान (Legislation), दुय्यम विधि विधान (Subordinate Legislation) तसेच इतर संबंधित वेगवेगळ्या विषयांवर माहिती देतील.

(च) विविध प्रकारचे कायदे व त्यांमधील विशिष्ट प्रकारच्या तरतुदींबाबतची माहिती,

(छ) संविधानातील कायदेविषयक तरतुदी व त्यांचा प्रत्यक्ष वापर कसा केला जातो याबाबतची माहिती,

(ज) विधि विधानाच्या कामकाजाबाबत संबंधित कार्यालयांना भेटी देणे, इत्यादी.

**(६)** इंटर्नशिप उपक्रम, विधि व न्याय विभाग, विधि विधान शाखा, पाचवा मजला, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे घेण्यात येईल.

**(७)** निवड झालेल्या प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांची नियुक्ती विधि व न्याय विभागातील, विधि विधान शाखेतील अधिकाऱ्यांकडे करण्यात येईल.

**(८) कार्य अहवाल** :- इंटर्नशिप उपक्रम समाप्तीच्या अंतिम आठवड्यात प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्याला प्रशिक्षणाबाबतचा अहवाल सचिव (विधि विधान) यांचेकडे सादर करावा लागेल.

**(९) प्रमाणपत्र** :- विद्यार्थ्यांनी इंटर्नशिप उपक्रम समाधानकारकरित्या पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना त्याबाबतचे प्रमाणपत्र, सचिव (विधि विधान), विधि व न्याय विभाग, यांच्या स्वाक्षरीने देण्यात येईल.

**(१०) इंटर्नशिप उपक्रम रद्द करण्याचा अधिकार** :- इंटर्नशिप उपक्रम रद्द करण्याचे किंवा त्यामध्ये बदल करण्याचे सर्वस्वी अधिकार सचिव (विधि विधान) यांना राहतील.

**(११) विद्यार्थ्यांच्या निवडीच्या अनुषंगाने विहित करण्यात येत असलेल्या अटी व शर्ती :-**

(क) विद्यार्थ्यांना राहण्याची सोय स्वत: करावी लागेल.

(ख) इंर्टनशिप उपक्रमात भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना कोणतेही मानधन, भत्ता किंवा खर्च देय असणार नाही.

(ग) निवड झाल्याचे पत्र मिळाल्यानंतर, निर्देशित केलेल्या ठिकाणी व विहित मुदतीत विद्यार्थ्यास स्वखर्चाने हजर व्हावे लागेल.

(घ) इंटर्नशिप उपक्रमाअंतर्गत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना कार्यालयातील सर्व नियमांचे पालन करुन निर्धारीत वेळेनुसार कार्यालयात उपस्थित राहावे लागेल.

(ङ) सचिव (विधि विधान) व विधि विधान शाखेतील अधिकाऱ्यांचे निदेश पाळणे बंधनकारक राहील.

(च) निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर संबंधित अधिकाऱ्यांवर निवडीसाठी कोणत्याही प्रकारे दबाव आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या उमेदवारास निवड प्रक्रियेतून बाद करण्याचा अधिकार सचिव (विधि विधान) यांना राहील.

(छ) इंटर्नशिप उपक्रमाच्या कालावधीत विद्यार्थ्यांना तात्पुरते प्रवेशपत्र देण्यात येईल व इंटर्नशिप कालावधी संपल्यानंतर सदर प्रवेशपत्र विभागाकडे जमा करणे बंधनकारक राहील.

(ज) काही अपरिहार्य कारणामुळे उक्त कालावधी दरम्यान इंटर्नशिप उपक्रम पूर्ण करणे शक्य न झाल्यास संबंधीत विद्यार्थ्याने सचिव (विधि विधान) यांना लेखी पूर्वसूचना देणे आवश्यक राहील.

(झ) इंटर्नशिप कालावधीत गैरशिस्तीच्या कारणामुळे एखाद्या विद्यार्थ्याचा इंटर्नशिप उपक्रम रद्द / समाप्त करण्याचा अधिकार सचिव (विधि विधान) यांना राहील.

(ञ) प्रत्येक विद्यार्थ्याने इंटर्नशिप उपक्रमादरम्यान केलेल्या कामकाजाचे विवरण तसेच त्यातून ज्ञात झालेल्या माहितीबाबत दैनंदिनीत नोंद ठेवणे आवश्यक राहील.

(ट) इंटर्नशिप उपक्रमाच्या अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचा अधिकार सचिव (विधि विधान) यांना राहील.

४. इंटर्नशिप सुरु करण्यापूर्वी, इंटर्नशिपबाबतचा कालावधी, इंटर्नशिपचे महिने ठरविणे, अर्ज मागविण्याबाबतची प्रक्रिया, विद्यार्थ्यांची निवड प्रक्रिया व इतर संबंधित बाबींविषयी स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येतील.

५. उक्त शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून , त्याचा संगणक संकेतांक २०२३११२४१७०८२८५३१२ असा आहे. सदर आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SATISH BABAN WAGHOLE

Digitally signed by SATISH BABAN WAGHOLE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=LAW AND JUDICIARY DEPARTMENT, 2.5.4.20=a8a564a8b86f10dd055a40390fac5e201097ebdc6d10d54485928bc2ca8562f4, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=4C1735DC74D982FD392B01D4C40FE989C2B0CAA52814EA95C856B28E1379DC21, cn=SATISH BABAN WAGHOLE
Date: 2023.11.24 17:12:44 +05'30'

**( सतिश वाघोले )**
**सचिव (विधि विधान), महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१) राज्यपालांचे सचिव,
२) मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३) उप मुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव,
४) उप मुख्यमंत्री (वित्त) यांचे सचिव
५) मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
६) सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव /सचिव,
७) सचिव, महाराष्ट्र विधानसभा / विधानपरिषद, विधान भवन, मुंबई,
८) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
९) भाषा संचालक, भाषा संचालनालय, मुंबई,
१०) विधि विधान शाखेतील सर्व अधिकारी, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.

GOVERNMENT OF MAHARASHTRA,
LAW AND JUDICIARY DEPARTMENT,
LEGISLATION BRANCH,
MANTRALAYA, MUMBAI-400032

## APPLICATION FORM FOR VOLUNTARY INTERNSHIP SCHEME FOR LAW STUDENTS

| | | |
|---|---|---|
| 1. | Full Name of the Applicant (in capital letters): | |
| 2. | Mother's Name: | |
| 3. | Address for Correspondence: | |
| 4. | Telephone/ Mobile No.: | |
| 5. | Email ID: | |
| 6. | Date of Birth: | |
| 7. | Sex: | |
| 8. | Name of the University/Institution/ College (Bona-Fide Certificate to be enclosed): | |
| 9. | Course presently pursuing and year-<br>(a) Masters of Law:<br>(b) 5 years course:<br>(c) 3 years course: | |
| 10. | Educational Qualification: | |

| Sr. No | Educational Qualification | Name of the Board | Examination Passed and Year of Examination Passed | Division with Percentage | Subjects/ Specializa -tion |
|---|---|---|---|---|---|
| (a) | Matriculation (SSC) | | | | |
| (b) | Intermediate (HSC) | | | | |
| (c) | Non Law Graduation | | | | |
| (d) | Integrated Law Course Graduation (percentage of last passed examination) | | | | |
| (e) | Law Graduation (percentage of last exam) | | | | |

| | | |
|---|---|---|
| 11. | Why do you want to join this Internship (not exceeding 100 words) : | |

**Recommendation of the Head/Dean/ Principal of the Institution/ College/ University**

Name :

Designation :

Signature with seal :

Mobile no :

Email ID :

-----------------------------------------------------------------------------------------------------

Note: Duly typed application form shall be forwarded to the Secretary (Legislation), Law and Judiciary Department, Mantralaya, Mumbai 400032 or email to sec.legislation@maharashtra.gov.in